**क्रांतिकुमार पाटील : कमला महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनाला सुरुवात**

# वाचनामुळे वैचारिक संपन्नता वाढते

नसीर अत्तार



कोल्हापुरात शुक्रवारी कमला महाविद्यालयातील ग्रंथ प्रदर्शनातील ग्रंथ पाहताना प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील. शेजारी ग्रंथपाल ऊर्मिला कदम, विजयश्री बुक सेंटरचे जॉर्ज क्रूझ, आदी.



ग्रंथ प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थिनींनी केलेली गर्दी.

कोल्हापूर : वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. शिवाय त्यातून वैचारिक संपन्नता वाढते, असे प्रतिपादन कमला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी आज (शुक्रवार) येथे केले.

ग्रंथालय सप्ताहानिमित्त कमला महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग व विजयश्री बुक सेंटरतर्फे दोनदिवसीय ग्रंथप्रदर्शन आयोजित केले आहे. महाविद्यालयाच्या अभ्यासिकेतील या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले, माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात सध्या पुस्तके आपले अस्तित्व टिकवून आहेत. वाचन माणसाला समृद्ध बनविते. वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊन वैचारिक संपन्नता वाढते आणि त्यातून भविष्यातील वाटचालीला दिशा मिळते.

या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ग्रंथपाल ऊर्मिला कदम, विजयश्री बुक सेंटरचे जॉर्ज क्रूझ, प्रा. आनंदा साळोखे, भारती शेळके, अनघा पाठक, रेखा पंडित, आदींसह विद्यार्थिनी उपस्थित होत्या. दरम्यान, या प्रदर्शनामध्ये स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी उपयुक्त पुस्तके, समाजशास्त्र, मानसशास्त्र, संगणक, पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या सुमारे दोन हजार ग्रंथांचा समावेश आहे. प्रदर्शनातून सवलतीच्या दरात ग्रंथ उपलब्ध करून दिले जाणार आहेत. उद्या (शनिवार) प्रदर्शनाचा शेवटचा दिवस आहे. (प्रतिनिधी)